दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

**वर्ष : ०४**, अंक : २५३
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.२४ एप्रिल २०२५












## हल्ल्यानंतर भारताचे पाकिस्तान विरोधात सर्वात कठोर निर्णय !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यानंतर केंद्र सरकारने कठोर पावलं उचलली आहेत. या हल्ल्यानंतर आज अतिशय मोठ्या घडामोडी घडल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दिल्लीतील निवासस्थानी सीसीएस म्हणजेच कॅबिनेट सुरक्षा समितीची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर उपस्थित उपस्थित होते. ही बैठक जवळपास ३ तास सुरु होती. या बैठकीनंतर परराराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्यांनी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत महत्त्वाची माहिती देण्यात आली. या हल्ल्यामागे पाकिस्तानचा हात असल्याचं स्पष्ट झालं आहे. त्यामुळे सीसीएसच्या बैठकीत पाकिस्तान विरोधात कठोर पावलं उचलण्यात आल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाकडून देण्यात आली आहे.



भारताने आता पाकिस्तानी नागरिकांना भारतात येण्यासाठी व्हिसा कायमचा बंद केला आहे. तसेच जे पाकिस्तानी नागरिक सध्या भारतात आहेत त्यांनादेखील पुढच्या ४८ तासांत देश सोडून जाण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच भारताने अटारी-वाघा बॉर्डर बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. अटारी-वाघा बॉर्डर १ मे पर्यंत बंद राहणार असल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे.

केंद्र सरकारने सिंधू जल करार देखील रद्द करण्याचा निर्णय घेतल्याची देखील मोठी बातमी समोर येत आहे. भारतातील पाकिस्तानी दुतावास बंद करण्यात आला आहे. तसेच पाकिस्तानच्या हायकमिशनच्या ५ अधिकाऱ्यांना देखील हटवण्यात आलं आहे. पाकिस्तानच्या राजकीय अधिकाऱ्यांनी एका आठवड्यात भारत सोडावा, असा देखील आदेश देण्यात आला आहे.

**पाकिस्तानात असणाऱ्या भारतीयांनादेखील सूचना**

केंद्र सरकारने पाकिस्तानी नागरिकांना भारतात येण्यास बंदी केली आहे. तसेच सध्याच्या घडीला भारतात असणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांत त्यांच्या मायदेशी परत जाण्याचा आदेश दिला आहे. पण सध्याच्या घडीला पाकिस्तानात फिरायला गेलेल्या भारतीयांचं काय? असा प्रश्न अनेकांना पडला असेल. तर भारत सरकारने पाकिस्तानात गेलेल्या भारतीयांना १ मे पर्यंत भारतात येण्याचे आदेश दिले आहेत. पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भारत-पाकिस्तान संबंध पुन्हा ताणले गेले आहेत. त्यामुळे भारतीय नागरिकांनी लवकरात लवकर मायदेशी परतण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

**जगभरातील देशांचा भारताला पाठिंबा, परराष्ट्र मंत्रालयाची माहिती**

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज वरिष्ठ पातळीच्या सीसीएसची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत हल्ल्याबाबत सविस्तर चर्चा झाली. सीसीएसने या हल्ल्याची गंभीर दखल घेतली आहे. हल्ल्यात जीव गमावलेल्या नागरिकांप्रती सीसीएसने संवेदना व्यक्त केल्या आहेत. जगभरातील अनेक देशांनी या घटनेवर दुःख व्यक्त केलं आहे, अशी देखील माहिती परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्यांनी पत्रकार परिषदेत दिली.

## थोडक्यात

### नायगांव येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे भव्य स्मारक, १४२ कोटींची तरतूद

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.२३, मुंबई :** स्त्री शिक्षणाची मशाल पेटवणाऱ्या आद्य क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मगावी मौजे नायगाव (ता. खंडाळा, जि. सातारा) येथे भव्य स्मारक आणि महिला प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. मौजे नायगाव येथील या स्मारकासाठी १४२ कोटी ६० लाख रुपये तर महिला प्रशिक्षण केंद्रासाठी ६७ लाख १७ हजार रुपयांच्या तरतूदीस मंजूरी देण्यात आली.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंच्या जयंती दिनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या स्मारकाची घोषणा केली होती. त्यानुसार आज मंत्रीमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला. क्रांतीज्योती सावित्रीबाई यांचे हे स्मारक त्यांच्या कार्याला अभिवादन ठरणार आहे. तसेच सोबतच उभे राहणारे महिला प्रशिक्षण केंद्र या परिसरातील महिलांसाठी सबलीकरणासाठी मार्गदर्शक ठरणार आहे.

महिला प्रशिक्षण केंद्राचे दीर्घकालीन व्यवस्थापन, प्रशासन, तसेच प्रशिक्षण कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी सातारा यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीत जिल्हा परिषद, पोलीस प्रशासन, यशदा, कौशल्य विकास विभाग तसेच ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे प्रतिनिधी यांचा समावेश राहणार आहे.

### भन्नाट खेळीने मुंबईचा विजय, हैदराबादवर नामुष्कीची वेळ

**अक्षराज : वृत्तसंकलन**



**दि.२३, हैदराबाद :** रोहित शर्मा एका फॉर्मात आला की त्याचा नाद करायचा नाही, हे पुन्हा एकदा पाहायला मिलाले. गेल्या सामन्यात रोहितच्या बॅटचा गंज उतरला होता. त्यानंतर आजच्या डठकीी चख सामन्यात त्याने पुन्हा एकदा अर्धशतक झळकावले आणि संघाला विजय मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली. हैदराबादच्या संघाने हेन्रीच क्लासिनच्या अर्धशतकाच्या जोरावर १४३ धावा उभारल्या होत्या. या आव्हानाचा पाठलाग करताना रोहित शर्माने दणदणीत खेळी साकारली आणि त्यामुळे मुंबईने सलग चौथा सामना जिंकला. रोहित शर्माने यावेळी ४६ चेंडूंत ७० धावांची मॅचविनिंग खेळी साकारली, तर सूर्यकुमार यादवने नाबाद ४० धावा करत त्याला सुयोग्य साथ दिली. मुंबईने यावेळी हैदराबादवर सात विकेट्स राखून मोठा विजय मिळवला.

हैदराबादच्या १४४ धावांचा पाठलाग करताना मुंबईला चांगली सुरुवात करता आली नव्हती. कारण सलामीवीर रायन रिक्लेटन हा लवकर बाद झाला, त्याने ११ धावा केलया. त्यानंतर फलंदाजीला आलेला विल जॅक्सही जास्त धावा करू शकला नाही, त्याला २२ धावांवर समाधान मानावं लागलं. एका बाजूने विकेट्स पडत असल्या तरी रोहित शर्मा मात्र यावेळी धमाकेदार फटकेबाजी करत राहीला. रोहित शर्माने यावेळी हैदराबागचा कर्णधार पॅट कमिन्सचा चांगलाच समाचार घेतला. रोहित शर्माने यावेळी दमदार फटकेबाजी केली आणि आपले ऐटीत अर्धशतक साकारले. रोहितचे हे सलग दुसरे अर्धशतक ठरले. रोहितला यावेळी सूर्यकुमार यादवची चांगली साथ मिळाली. त्यामुळेच भारताला हा विजय साकारणे सोपे झाले.

मुंबईने टॉस जिंकला आणि हार्दिकने प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. हार्दिकला यावेळी मुंबईच्या गोलंदाजांनी चांगली साथ दिली. सलामीवीर ट्रेव्हिस हेड आणि अभिषेक शर्मा यांना मुंबईच्या गोलंदाजांनी लवकर बाद केले. इशान किशनला तर यावेळी आपण आऊट आहोत की नाही, हेच समजले नाही आणि तो मैदानाबाहेर पडला. हैदराबादची ५ बाद ३५ अशी अवस्था होती. त्यावेळी क्लासिन त्यांच्या मदतीला आला. क्लासिनने ७१ धावांची दमदार खेळी साकारली आणि संघाला आव्हानात्मक धावसंख्या उभारून दिली. मुंबई इंडियन्सकडून यावेळी ट्रेंट बोल्टने सर्वाधिक चार बळी मिळवले, तर दीपक चहरने दोन विकेट्स पटकावल्या.

## पहलगाम हल्ल्याबाबत आतापर्यंतचा सर्वात मोठा खुलासा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, पहलगाम :** पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर जम्मू आणि काश्मीरमध्ये मोठी कारवाई सध्या सुरू आहे. दहशतवाद्यांकडून पर्यटकांना टार्गेट करत हल्ला करण्यात आला. देशातील अनेक भागातील पर्यटकांचा या हल्ल्यात जीव गेला. धर्म विचारून दहशतवाद्यांनी लोकांना टार्गेट केले. गेल्या काही महिन्यांपासून या हल्ल्याचा कट रचला जात असल्याची हैराण करणारी माहिती पुढे येताना दिसतंय. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, काश्मीर खोऱ्यात १५०० हून अधिक लोकांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. या लोकांना वेगवेगळ्या जिल्ह्यांमधून आणि संवेदनशील भागातून पकडण्यात आले आहे. पहलगामच्या हल्ल्यात दोन स्थानिकांचा देखील समावेश असल्याने मोठी खळबळ उडालीये. पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्याबद्दल एक अत्यंत मोठी



आणि हैराण करणारी अपडेट पुढे येताना दिसतंय. नुकताच मिळालेल्या माहितीनुसार, दहशतवाद्यांनी अगोदर रेकी करून हा दहशतवादी हल्ला घडवून आणलाय. या भागात १ ते ७ एप्रिल दरम्यान हल्लेखोरांनी संपूर्ण रेकी केली होती.

घटनास्थळापासून काही अंतरावर सुरक्षा दलांना नंबर प्लेट नसलेली मोटारसायकल सापडली होती, जी कालच जप्त करण्यात आली. गुप्तचर सूत्रांकडून पहलगाम हल्ल्याबाबत मोठा खुलासा करण्यात आला आहे. हे दहशतवादी लष्कराच्या गणवेशात दाखल झाले होते. हिंदू असल्याचे स्पष्ट होताच दहशतवाद्यांनी गोळ्या घालून ठार केले. यादरम्यान त्यांनी महिला आणि लहान मुलांना टार्गेट केले नसल्याचेही स्पष्ट झाले.

जम्मू-काश्मीर पोलिस, लष्कर आणि सीआरपीएफने दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी शोध मोहीम सुरू केली आणि पहलगाम आणि आसपासच्या भागात संपूर्ण नाकेबंदी केली. सर्व महत्त्वाच्या मार्गांवर वाहनांची तपासणी केली जात आहे. हेलिकॉप्टरद्वारे दहशतवाद्यांचा शोध घेतला जात आहे. काही ठिकाणी दहशतवाद्यांसोबत चकमक झाल्याचीही माहिती मिळत आहे. सरकारकडून या हल्ल्यानंतर कडक पाऊले उचलली जात आहेत. दिल्लीमध्ये एक बैठक पार पडली आणि काही मोठे निर्णय घेण्यात आली.

## धर्मादाय रुग्णालयांवर नियंत्रणासाठी विशेष तपासणी पथकाची घोषणा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२३, मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथिगृह येथे झालेल्या आढावा बैठकीत धर्मादाय रुग्णालयांमध्ये निर्धन रुग्णांना मोफत सेवा न मिळाल्याच्या तक्रारींची गंभीर दखल घेण्यात आली. यासाठी धर्मादाय आयुक्त, आरोग्य विभाग व मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष यांच्या समन्वयातून विशेष तपासणी पथक तयार करण्याचे निर्देश देण्यात आले.



धर्मादाय रुग्णालयांनी १०% खाटा निर्धन आणि १०% दुर्बल घटकासाठी राखीव ठेवणे बंधनकारक असून, अनामत रक्कम न घेता तातडीची सेवा देणे आवश्यक आहे. रुग्णालयांनी शिल्लक खाटा, उपचारांची माहिती ऑनलाईन प्रणालीत भरावी यासाठी सक्तीचे नियम लागू करण्याचे आदेश देण्यात आले. प्रत्येक धर्मादाय रुग्णालयात फलक व डॅशबोर्डद्वारे माहिती जाहीर करण्याची व्यवस्था करावी, जिल्हास्तरीय समित्या स्थापन करून देखरेख ठेवावी आणि माहिती न भरलेल्या रुग्णालयांवर कारवाई करावी असेही निर्देश दिले. २०२३ पासून सुरू असलेल्या धर्मादाय मदत कक्षामार्फत आजवर ७,३७१ रुग्णांना ₹२४.५३ कोटींचा उपचार निधी वितरित करण्यात आला, अशी माहिती मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षातर्फे देण्यात आली. उपमुख्यमंत्री अजित पवार, मुख्य सचिव, अपर मुख्य सचिव, यांच्यासह विविध वरिष्ठ अधिकारी आणि डॉक्टर बैठकीला उपस्थित होते.

## बुलढाण्याच्या कुटुंबाला पहलगामच्या हॉटेल मालकाने वाचवलं

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२३, बुलडाणा :** जम्मू काश्मीर येथील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात जवळपास २५ पेक्षा जास्त जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये महाराष्ट्रातील सहा जणांचा समावेश आहे. सुदैवाने बुलढाणा जिल्ह्यातील पाच जणांचा जीव या दुर्घटनेतून बचावला आहे.

अचानक फायरिंग सुरू झाल्याने हॉटेल मालकाने त्यांना बाहेर जाण्यापासून थांबवलं आणि संपूर्ण कुटुंब बचावलं. निलेश जैन, पारस अरुण जैन, ऋषभ अरुण जैन, सौ श्वेता निलेश जैन, अनुष्का निलेश जैन अशी बचावलेल्या कुटुंबीयांची नावं आहेत. १८ तारखेला हे कुटुंब मुंबईहून काश्मीरला निघाले होते. जम्मू काश्मीरमधील सर्व ठिकाणी फिरुन झाल्यानंतर २१ तारखेला रात्री पहलगाममध्ये हॉटेलला आले. २२ ला सकाळी पहलगाममध्ये फिरायला निघणार, तेवढ्यात हॉटेलच्या लोकांनी गोळीबार झाल्याचे व बाहेर न पडण्यास सांगितले. आता हे कुटुंब सुखरूप असल्याची माहिती मिळत आहे. जेव्हा फायरिंग होत होती तेव्हा बुलढाण्यातील कुटुंब तिथेच हॉटेलमध्ये होते. फायरिंगच्या आवाजाने परिवार खूप घाबरला होता. दुसरीकडे, गोव्यात मडगाव येथे राहणाऱ्या दर्शिता देसाई आणि त्यांचे कुटुंबीय सहलीसाठी काश्मीरला रविवारी पोहचले. 'पावसामुळे रस्ता निसरडा झाल्याने बैसरन व्हॅलीला न जाण्याचा निर्णय आम्ही घेतला आणि बचावलो,' या शब्दांत दर्शिता देसाई यांनी 'महाराष्ट्र टाइम्स'शी बोलताना आपल्या भावना व्यक्त केल्या. दर्शिता आणि त्यांचे कुटुंब मंगळवारी सकाळी बैसरन व्हॅलीमध्ये फिरायला जाणार होते. मात्र आदल्या दिवशी पाऊस पडल्यामुळे येथील रस्ता निसरडा झाला होता. त्यामुळे तिथे जाऊ नये असे दर्शिता यांच्या सासूबाईंनी सांगितले. त्यामुळे कुटुंबाने आपला बेत रद्द केला. दुपारी बैसरन खोऱ्यामध्ये गोळीबार झाल्याचे कळले. तेव्हा वर गेलो असतो, तर काय झाले असते, या विचाराने त्यांच्या पोटात गोळा आला.




## व्यसनाची भूक कमी करूया

आजकाल तरुणांमध्ये व्यसनाचे प्रमाण फार वाढले आहे. आणि पुस्तकांच्या वाचनाचे प्रमाण फार कमी झाले आहे.वाईट व्यसनाने माणूस माणसातून उठतो तर पुस्तकांच्या वाचनाने माणूस माणसात येतो. असे म्हटले जाते. हे काय खोटे नाही. कारण आजकालचा माणूस चांगले व्यसन करण्यापेक्षा, वाईट व्यसनाच्या आहारी पटकन जात आहे. आणि स्वतः च्या जीवनाला व्यसनाच्या विखारी विळख्यात ओढत आहे. ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात व्यसनी तरुणांचे प्रमाण अधिक वाढले आहे. कारण ग्रामीण भागातील तरुण-तरुणी आई-वडिलांच्या धाकात असतात. आणि शहरी भागातील तरुण-तरुणी मोकाट कुत्र्यांसारखे बोंबलत फिरतात. त्यांना आई-वडील शिक्षणासाठी शहरी भागात पाठवतात. पण हे म ोकाट तरुण-तरुणी शिक्षणाच्या नावाखाली व्यसनाचा बाजार मांडतात. आई-वडिलांकडून व भावांकडून शिक्षणासाठी दर महिन्याला पैसे उकळतात. आणि मोठ्या ढाब्यावर जाऊन व्यसन व जेवण करतात. महागड्या किंमतीची वाईन पितात. सोबत सिगारेटचा धूर काढतात. आणि चंगळवादी जीवन जगतात. व्यसन करण्याच्या बाबतीत मुलीही काही कमी नाहीत. तर त्या मुलांपेक्षा एक पाऊल पुढेच आहेत. शहरी भागात मुलांपेक्षा मुलींचे व्यसन करण्याचे प्रमाण अधिक असल्याचे चित्र सध्या समोर येत आहे. आजकाल तर काही महाभाग कॉलेजला जाताना बॅगमध्ये नावालाच एक पेन आणि वही घेऊन जात आहेत. आणि बाकी बॅग मध्ये सिगारेटचे पॉकेट, गुटख्याच्या पुड्या व दारूच्या बॉटल सोबत घेऊन जात आहेत. आणि शाळेतील मोकळ्या मैदानावर किंवा वर्गातील बाकावर बसून दारू पीत पीत सिगारेटचा धूर काढत असतात. वर्गामध्ये गुटखे व तंबाखू खाऊन तिथेच पचकन पिचकाऱ्या मारतात. त्यामुळे कॉलेजला महाविद्यालय म्हणावे की? व्यसनालय म्हणावे? हेच कळत नाही. म्हणून प्रत्येक कॉलेजमध्ये व्यसनाच्या आहारी गेलेल्या तरुणाईचा प्रचंड बोलबाला आहे. असली बेवडी तरुणाई आपल्या शिक्षकांसोबत वाद-विवाद करायला ही मागे पुढे पाहत नाही. काही काही तरुण तर नशेच्या भरात शिक्षकांना व मुलींना भलतेच काहीतरी बोलून ठेवतात. अशा निर्लज्ज व निसाक तरुणांना आपण शिक्षकांना वाईट बोललो याचे काहीच दुःख व खंत वाटत नाही. कारण अशा निसाक व बेवड्या तरुणांना बालवयात कुठेतरी आई-वडिलांचे व शाळेतील शिक्षकांचे संस्कार कमी पडलेत असेच म्हणावे लागेल. कारण सुसंस्कारी व अभ्यासू मुले शिक्षकांना कधीच वाईट व उद्धट बोलत नाहीत. कारण त्यांना त्यांचे सुसंस्कार तसे उद्धट व वात्रट बोलू देत नाहीत. ते नेहमी अभ्यासात व वाचनात गर्क राहतात. आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवून जोमाने अभ्यास व वाचन करतात. पण आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवून अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आता फार कमी झाली आहे. म्हणून सध्या विद्यार्थ्यांना शिक्षणाचे व वाचनाचे महत्त्व पटवून देणे व त्यांची संख्या वाढवणे सध्या काळाची नितांत गरज बनली आहे. ज्ञानाचे, समतेचे व मानवतेचे महानायक डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी तरुणांना वाचाल तर वाचाल असे उद्देशून म्हटले होते. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ज्ञानाची इतकी प्रचंड भूक होती की, त्यांनी विद्यार्थी दशेत सतत अठरा-अठरा तास वाचन व चिंतन करून ज्ञानाची भूक भागवली. म्हणून त्यांना आदराने ज्ञानाचे प्रतीक असे म्हटले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी दशेत सतत अठरा-अठरा तास वाचन व चिंतन करायचे. तर मग आपण त्यांच्यापेक्षा कमी नऊ तास वाचन का करू शकत नाही? कारण इथून पुढे वाचणारेच वाचणार आहेत. आणि बाकीचे अलगद फसणार आहेत. म्हणून तरुणांनो आपण आता व्यसनाची भूक कमी करून वाचनाच्या माध्यमातून ज्ञानाची भूक वाढवायला हवी. आपोआपच आपली विचारधारा वाढेल. त्यासाठी आपण स्वतःला पुस्तकांच्या विश्वात घेऊन गेलं पाहिजे. आणि चांगल्या व निर्मळ विचारांच्या पुस्तकांचे सखोल वाचन केले पाहिजे. त्यासाठी आपण थोर महापुरुषांची व विचारवंतांची जीवन चरित्रे, आत्मचरित्रे, कथासंग्रह, काव्यसंग्रह, कादंबऱ्या व उपन्यास वाचून ज्ञानाची भूक वाढवली पाहिजे. कारण माणूस मरेपर्यंत विद्यार्थीच राहतो. ज्ञान हे अथांग सागरा एवढे आहे. त्याच्या खोलीचा अंदाज कोणालाच लावता येऊ शकत नाही. म्हणून तरुणांनी शरीरात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत वाचन व चिंतन केले पाहिजे. वाचनाने आपली बुद्धी प्रगल्भ होऊन स्मरणशक्ती व वैचारिक पातळी वाढते. म्हणून लहान असो या थोर प्रत्येकाने पुस्तकांचे वाचन केलेच पाहिजे. वाचन करण्यासाठी आपल्याला वयोमर्यादा नाही. हे लक्षात ठेवून आपण संत तुकाराम महाराज, संत नामदेव महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, साने गुरुजी, डॉ. नरेंद्र दाभोलकर व वेगवेगळ्या महापुरुषांनी लिहिलेल्या विविध पुस्तकांचे वाचन करणे ही सध्या काळाची गरज बनली आहे.

## क्रिकेटच्या देवाचा वाढदिवस !

क्रिकेट हा भारतातील सर्वाधिक लोकप्रिय खेळ आहे म्हणूनच क्रिकेट हा भारताचा धर्म आहे असे मानले जाते आणि खेळात सचिन तेंडुलकर याने जी असामान्य कामगिरी केली आहे त्यामुळे त्याला क्रिकेटचा देव मानले जाते. आज याच क्रिकेटच्या देवाचा म्हणजे सचिन तेंडुलकरचा ५२ वा वाढदिवस आहे. २४ एप्रिल १९७३ रोजी मुंबईत सचिनचा जन्म झाला. त्याचे वडील रमेश तेंडुलकर हे प्राध्यापक होते तसेच मराठीतील प्रसिद्ध साहित्यिक होते तर आई शिक्षिका होत्या. त्या काळातील प्रसिद्ध संगीतकार सचिनदेव बर्मन ह्यांच्या नावावरुन त्याचे सचिन असे नाव ठेवण्यात आले. सचिनने शारदाश्रम विद्यामंदिर या शाळेत रमाकांत आचरेकर यांच्याकडून क्रिकेटचे धडे गिरवायला सुरवात केली. रमाकांत आचरेकर यांनी बालवयातच सचिनची गुणवत्ता हेरुन त्याला प्रशिक्षण दिले. शाळेत असतानाच सचिनने त्याच्या शाळेतील सहकारी मित्र विनोद कांबळी याच्यासोबत हॅरिस शिल्ड स्पर्धेत ६६४ धावांची विक्रमी भागीदारी रचली. सचिनने त्याच्या पहिल्या प्रथम श्रेणी सामन्यातच शतक झळकवण्याचा विक्रम केला. तेंव्हा त्याचे वय १५ वर्ष २३२ दिवस होते आणि त्यावेळी पहिल्या सामन्यात शतकी खेळी करणारा तो सर्वात तरुण खेळाडू होता. सचिन हा असा एकमेव खेळाडू आहे ज्याने रणजी, दुलीप व इराणी चषकाच्या पहिल्या साम न्यात शतक झळकावले. देशांतर्गत क्रिकेटमध्ये अप्रतिम कामगिरी केल्याने वयाच्या १६ व्या वर्षीच सचिनची भारतीय संघात निवड झाली. १९८९ साली त्याने आपला पहिला आंतरराष्ट्रीय सामना पाकिस्तान विरुद्ध कराची येथे खेळला. त्या सामन्यात त्याने इम्रान खान, वसीम आक्रम, वकार युनूस, अब्दुल कादिर या दिग्गज गोलंदाजांचा सामना केला. अर्थात त्याला पहिल्या सामन्यात विशेष काही करता आले नाही. अवघ्या १५ धावांवर तो बाद झाला मात्र पुढच्या सामन्यात त्याने अर्धशतक झळकावुन आपल्या क्षमतेची चुणूक जगाला दाखवून दिली. त्यानंतर तो भारतीय संघासोबत न्यूझीलंड दौऱ्यावर गेला तिथे ८८ धावांची त्याने लाजवाब खेळी केली मात्र त्याला खरी ओळख मिळाली ती १९९१ - ९२ च्या ऑस्ट्रेलियन दौऱ्यात. या दौऱ्यात त्याने पर्थ मधील उसळत्या आणि वेगवान खेळपट्टीवर शतकी खेळी केली. ज्याखेळपट्टीवर जगभरातील दिग्गज फलंदाज तग धरू शकत नाही अशा खेळपट्टीवर सचिनने ऑस्ट्रेलियाच्या दर्जेदार गोलंदाजीसमोर शतक झळकवल्याने हा खेळाडू लंबी रेस का घोडा आहे असे जाणकार म्हणू लागले. त्यानंतर सचिनने मागे वळून पाहिले नाही. जगभरातील सर्वच खेळपट्टीवर त्याने धावा काढायला सुरवात केल्या. १९९६ च्या विश्वचषकात त्याने सर्वाधिक धावा काढून गोल्डन बॅट मिळवली. १९९० च्या दशकात तर सचिनच्या बॅटने अक्षरशः धुमाकूळ घातला. ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, वेस्टइंडिज, पाकिस्तान, श्रीलंका, झिम्बाब्वे अशा सर्वच संघविरुद्ध त्याने खोऱ्याने धावा केल्या. १९९७ साली विसडेनने त्याला त्या वर्षीचा सर्वोत्तम वार्षिक खेळाडू म्हणून घोषित केले. ह्याच वर्षी त्याने पहिल्यांदा कसोटीत १००० धावा केल्या. ह्याची सचिनने १९९९, २००१, २००२ साली पुनरावृत्ती केली. सचिनने वर्षात १००० पेक्षा जास्त धावा करण्याचा विक्रम सलग सहा वेळा केला आहे. असा करणारा तो एकमेव खेळाडू आहे. सचिन तेंडुलकर हा क्रिकेट विश्वात डॉन ब्रॅडमन यांच्यानंतर जागतिक स्तरावर सर्वोत्तम मानला जाणारा क्रिकेटपटू आहे. २००२ मध्ये कारकिर्दीच्या बाराव्या वर्षीच, विसडेनने डॉन ब्रॅडमन यांच्यानंतर सार्वकालिक दुसरा सर्वोत्तम कसोटीपटू व व्हीव्ह रिचर्डस नंतरचा दुसरा सार्वकालिक सर्वोत्कृष्ट एकदिवसीय फलंदाज म्हणून सचिन तेंडुलकरची निवड केली होती. स्वतः डॉन ब्रॅडमन यांनी सचिनच्या फलंदाजीत स्वतःची छबी दिसते असे म्हटले होते. २००३ साली दक्षिण आफ्रिकेत झालेल्या विश्वचषक स्पर्धेत त्याला मालिका विराचा पुरस्कार देण्यात आला मात्र संघाला विश्वचषक जिंकता आला नाही याची त्याला खंत होती. देशाला विश्वचषक जिंकून द्यायचे हे त्याचे स्वप्न होते. हे स्वप्न २०११ साली पूर्ण झाले. सचिनचे दुसरे नाव म्हणजे विक्रम. विक्रमांचे विक्रम करण्याची असाधारण कामगिरी त्याने केली. त्यांचे विक्रम सांगायला गेलो तर पानही पुरणार नाही. आंतरराष्ट्रीय सामन्यात १०० शतक करणारा तो एकमेव खेळाडू आहे. सर्वाधिक धावा, सर्वाधिक सामनावीर, सर्वाधिक मालिकाविर , सर्वात जास्त सामने असे कितीतरी विक्रम त्याच्या नावे आहे. त्याला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. अर्जुन पुरस्कार, राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार, पद्मविभूषण या पुरस्कारांनी त्याला गौरविण्यात आले आहे. भारतरत्न या देशाचा सर्वोच्च पुरस्काराने देखील त्याला गौरविण्यात आले. भारतरत्न मिळवणारा तो एकमेव खेळाडू आहे. तो राज्यसभेचा खासदारही होता. भारतीय हवाई दलाने त्याला ग्रुप कॅप्टन हा गौरवात्मक हुद्दा प्रदान केला आहे. त्याला अनेक विद्यापीठाची डिलीट ही मानाची पदवी मिळाली आहे. सचिनचा खेळ पाहतच आम्ही लहानाचे मोठे झालो. त्याचा खेळ पाहायला मिळाला हे आमच्या पिढीचे भाग्य. १४० कोटी भारतीयांना आनंद साजरा करण्याची संधी सातत्याने निर्माण करुन देणाऱ्या या क्रिकेटच्या देवाला ५२ व्या वाढदिवसाच्या आभाळभर शुभेच्छा !



**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

## कामगार कायद्यांमध्ये सुधारणा; महाराष्ट्र कामगार संहिता नियम तयार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२३, मुंबई :** केंद्रीय कामगार संहितेच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र वेतन संहिता नियम, २०२५ आणि महाराष्ट्र औद्योगिक संबंध संहिता नियम, २०२५ यांना आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

केंद्र सरकारने १९९९ मध्ये माजी कामगार मंत्री रविंद्र वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली दुसरा श्रम आयोग नियुक्त केला होता. या आयोगाने सर्व २९ कामगार कायदे एकत्रित करून केवळ चार काम गार संहिता तयार करण्याची शिफारस केली होती.



त्यानुसार केंद्राने चार संहिता तयार केल्या आहेत. त्यामध्ये वेतन संहिता, औद्योगिक संबंध संहिता, सामाजिक सुरक्षा संहिता आणि व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाची स्थिती संहिता यांचा समावेश आहे. या चार संहिताचे अधिनियम संसदेनेही मंजूर केले आहेत. कामगार हा विषय समवर्ती सूचीमध्ये आहेत. केंद्राने सर्व राज्यांसाठी एकत्रित संहिता तयारी केली आहे. या संहितांची अंमलबजावणी सर्व राज्यांमध्ये एकत्रितरित्या करावी लागणार आहे. त्यासाठी राज्यांना संबंधित संहितांच्या अंमलबजावणीसाठी नियम तयार करावे लागणार आहेत. त्यानुसार राज्याच्या काम गार विभागाने महाराष्ट्र वेतन संहिता नियम, २०२५ आणि महाराष्ट्र औद्योगिक संबंध संहिता नियम, २०२५ तयार केले होते. या नियमांना विधी व न्याय विभागाने काही सुधारणांसह मान्यता दिल्याने या नियमांना आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. त्यानुसार या नियमांचा प्रस्ताव मान्यतेसाठी केंद्र सरकारकडे पाठविण्यात येईल.

## टाळी..

हातदोन्ही शिवशिवे
कुणी द्यायची टाळी
घेणार का पुढाकार
कशा तिष्ठतकंटाळी

जुनाट गोष्टी उगाळी
प्रसंग तेचं कवटाळी
काही काहीचं घडेन
जनता मात्र कंटाळी

प्रतिनिधी आपापले
एक दुजास पिटाळी
होयनाही म्हणायला
जीभ कोण विटाळी

खूपकाही अटीशर्ती
बारीकअक्षरी ओळी
विस्कटले असताना
कशी बांधावी मोळी

खात्रीमनांस मिळेना
दिल्याशब्दांस पाळी
माहीत असे सर्वांना
आली परिक्षा पाळी

तयार तत्पर मिडीया
भाजा आपली पोळी
ओली असून लाकडे
धडाडा पेटवते होळी

महत्वाचे जागी मात्र
आळीमिळीगुपचिळी
शेवटी एकचं निश्चित
बळी तोचं कानपिळी

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध अचूक बातमी

## हल्ल्याचा प्रतिशोध घ्यावा !



पहेलगाममध्ये झालेला आतंकवादी हल्ला देशाच्या अंतर्गत सुरक्षा व्यवस्थेचे वाभाडे काढणारा आहे. भारताचे नंदनवन समजल्या जाणाऱ्या काश्मीरमध्ये उन्हाळ्याच्या दिवसात पर्यटक येथील सौंदर्य आणि गारवा अनुभवण्यासाठी येत असतात.

यातून राज्यासह देशाला मोठ्या प्रम ाणात महसूल मिळतो. आतंकवाद्यांनी पर्यटकांना लक्ष करून काश्मीरविषयी भय निर्माण केले आहे. यातून भविष्यात काश्मीरमध्ये येणाऱ्या पर्यटकांची संख्या नक्कीच रोडावणार आहे ज्याच्या परिणाम देशाच्या महसूलावर होणार आहे. काश्म ीरमधून ३७० कलम काढल्यानंतर काही काळातच तेथील परिस्थिती भयमुक्त केल्याच्या वल्गना केंद्र सरकारकडून केल्या जात होत्या; मात्र या हल्याने त्या सपशेल फोल ठरवल्या. आतंकवादाला धर्म नसतो हे लहानपणापासून आम्हाला शिकवले गेले, मात्र काश्मीरमध्ये झालेल्या हल्यात आतंकवाद्यांनी पर्यटकांना त्यांचे धर्म विचारून केवळ हिंदूंना लक्ष केले हेही आता स्पष्ट झाले आहे. देशात आतंकवादी हल्याच्या धमक्या केवळ हिंदूच्या सण उत्सवांना आणि कुंभपर्वांना येतात. आजतागायत भारतात जे काही आतंकवादी हल्ले झाले ते करणारेही बहुतांश एकाच पंथांचे होते एव्हढे सर्व घडूनही आपण आजही हेच म्हणायचे का की आतंकवादाला धर्म नसतो? देशाच्या स्वातंत्र्यानंतर आतंकवादी हल्याचा जो अनुभव भारतीयांनी घेतला आहे तो अनुभव खचितच कोणत्या देशाने घेतला असेल. आतंकवाद्यांनी आजतागायत देशभरात हजारो निरपराध नागरिकांची हत्या केली आहे. स्त्रिया आणि बालकांनाही त्यांनी सोडलेले नाही.

हजारोंचे संसार उध्वस्त केले आहेत. देशाच्या संपत्तीची अपरिमित हानी केली आहे. स्वातंत्र्यानंतर आजतागायत अनेक सरकारे आली आणि गेली मात्र आतंकवादाचा बिमोड करणे कोणालाही शक्य झालेले नाही. पहेलगाम हल्यानंतरही समस्त राजकीय मंडळींनी तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केले आहेत. विरोधी पक्षांनी सत्तास्थानी असलेल्या भाजपला लक्ष केले आहे. माननीय पंतप्रधानांनीही आतंकवाद्यांना सोडणार नसल्याचे विधान केले आहे. देशाचे गृहमंत्री हल्ल्यानंतर तात्काळ श्रीनगरमध्ये दाखल झाले. आतंकवादी हल्ल्यानंतर तीव्र निषेध करणे, मेणबत्या पेटवणे, मोर्चे काढणे, सोशल मीडियावर चिड व्यक्त करणे आता पुरे झाले. भारतीयांना या हल्याचा प्रतिशोध हवा आहे तोही इस्त्रायल सारखा. इस्त्रायलवर ज्या आतंकवादी तळावरून हल्ला होतो तो तळच इस्त्रायल उध्वस्त करते.

ज्यू नागरिक जगाच्या पाठीवर कुठेही रहात असला तरी तो स्वतःला सुरक्षित समजतो कारण त्याच्या पाठीशी त्याचा देश उभा असतो. चोहोबाजूनी बलाढ्य शत्रूराष्ट्रानी वेढला असूनही इस्त्रायलने या देशावर आपला दरारा कायम ठेवला आले. त्या तुलनेत भारत बलशाली असतानाही भारतात अधूनमधून कुठेना कुठे आतंकवादी हल्ले होतच असतात. भारतानेही आता इस्त्रायलप्रमाणे बाणेदारपणा अंगीकारला पाहिजे. . देशात राहून शत्रूराष्ट्राशी इम ान राखणाऱ्या, आतंकवाद्यांना आश्रय देणाऱ्या स्थानिक देशद्रोह्यांनाही जन्माची अद्दल घडवायला हवी. आतंकवाद्यांच्या आश्रयस्थानांवर हल्ला करून त्याचे सम ूळ उच्चाटन करणे आणि आतंकवाद पोसणाऱ्या पाकिस्तानला कायमची अद्दल घडवणे हाच या हल्याचा प्रतिशोध असून भारताने त्यादृष्टीने सिद्धता करायला हवी!

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## पहलगाम घटना; राज्य आपत्कालीन कार्य केंद्रात २ अधिकाऱ्यांची नियुक्ती

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२३, मुंबई :** जम्मू व काश्मीर येथील पहलगाम येथे पर्यटकांवरील झालेल्या दहशतवादी हल्लूयात महाराष्ट्रातील बाधित नागरिकांच्या मदतीसाठी राज्य आपत्कालीन कार्यकेंद्र (मंत्रालय नियंत्रण कक्ष) येथील कक्षात दोन अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन संचालक सतीशकुमार खडके यांनी दिली.

मंत्रालय नियंत्रण कक्षात राज्य आपत्कालीन कार्य केंद्राचे व्यवस्थापक विशेषकर सुर्यवंशी व कक्ष अधिकारी नितीन मसळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी अथवा त्यांच्या नातेवाईकांनी मदतीकरिता मंत्रालय नियंत्रण कक्ष येथील दूरध्वनी क्रमांक ०२२-२२०२७९९०/२२७९४२२९ व भ्रमणध्वनी क्रमांक ९३२१५८७१४३ (वॉट्सअप क्रमांक) तसेच आपत्कालीन संपर्क क्रमांक (टोल फ्री १०७०) या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन श्री.खडके यांनी केले आहे.

## विंचूर सह नाशिक जिल्हा शिंपी समाजाकडून गनबोटे यांना भावपूर्ण श्रद्धांजली

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**



**दि.२३, विंचूर (नाशिक) :** पुणे येथील रास्ता पेठ, श्री संत नामदेव शिंपी समाज मंडळाचे सदस्य, दानशूर व्यक्तीमत्व, गट्टमा फरसाण चे मालक कै. कौस्तुभ गनबोटे हे 'पहलगाम' येथे इस्लामिक दहशतवाद्यांच्या भ्याड हल्लूयात मृत्युमुखी पडले.

गानबोटे परिवाराच्या दुःखात महाराष्ट्रातील विंचूर सह नाशिक जिल्ह्यातील संपूर्ण शिंपी समाज सहभागी आहे. ईश्वर त्यांच्या आत्मास चिर शांती देवो हीच श्री संत नामदेव चरणी प्रार्थना व्यक्त केली आहे. घडलेल्या घटनेचा निषेध करण्यासाठी रास्ता पेठ, समस्त नामदेव शिंपी समाज मंडळ, मारुती मंदिर येथे आज सायंकाळी ७.०० वा. सर्व समाज बांधवांनी एकत्रित जमावे व त्यानंतर रास्ता पेठ, पुणे येथील लकेरी मारुती चौकात असलेल्या कौस्तुभ गनबोटे यांच्या गट्टमा फरसाण या दुकाना पर्यंत कॅण्डल मार्च निघणार आहे.

असे सर्व समाज बांधवांना अवाहन करण्यात आले आहे. झालेल्या दुर्दैवी घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी सर्वांनी यामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले. यांच्या दुःखात विंचूर नाशिक जिल्हासह पुणे येथील नामदेव समाजोन्नती परिषद,ना.स.प. शाखा पुणे जिल्हा, ना.स.प. शाखा पुणे शहरना.स.प. शाखा पिंपरी- चिंचवड शहर, पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील सर्व ज्ञाती संस्था व संपूर्ण समाज बांधव सहभागी आहे.

## गुरूने केला भंगाराम तळोधी शाळेत शिष्याचा सत्कार

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.२३, चंद्रपूर :** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, भंगाराम तळोधी ही गोंडपिपरी तालुक्यातील ऐतिहासिक, जुनी शाळा आहे. विविध नवोपक्रम शाळेत सातत्याने आयोजित करीत असतात. अश्याच प्रकारे सन्मान यशवंताचा' या उपक्रमांतर्गत मनपा, मुंबई येथे 'कार्यकारी सहाय्यक' पद मिळविणाऱ्या सुरेश पार्वताबाई शिवराम सातपुते यांचा गुरुवर्य भारत घुबडे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. गोंडपिपरी या दुर्गम भागातील सोमनपल्ली या गावातील रहिवासी, अत्यंत हलाखीची परिस्थिती पण परिस्थितीवर मात करीत मिळेल ते काम करून अभ्यासात सातत्य राखले. सिक्युरिटी, वेटर यासारखे दुय्यम काम करून शिक्षणाचा ध्यास सोडला नाही. त्यांच्या या संघर्षाचा पाढा विद्यार्थ्यांना माहिती व्हावा, विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची ओढ निर्माण व्हावी, स्पर्धेच्या युगात विद्यार्थी टिकावेत यासाठी शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षक वृंदानी 'सन्मान यशवंताचा' या उपक्रमांतर्गत सत्कार आयोजित केला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी त्यांचे गुरुवर्य तथा शाळेचे उच्च श्रेणी मुख्याधापक भारत घुबडे, सत्कारमूर्ती सुरेश पार्वताबाई शिवराम सातपुते, अमित कुबडे, भगवान मडावी, श्रावण गुंडेट्टीवार, अरुण पुप्पलवार, सुधीर सहारे, दुशांत निमकर, किशोर भोयर, विकास झाडे, राजेश्वर अम्मावार, आकाश झाडे, तानाजी अल्लीवार, नितीन चौथाले, मीनाक्षी नेवारे, प्रेमा ताडूरवार इत्यादी सत्कार समारोह प्रसंगी उपस्थित होते.

## ज्ञानसंवर्धिनी प्रशालेची भविष्यवेधी वाटचाल कौतुकास्पद : हेमंतकुमार खाडे

**अक्षराज :बाळू धायगुडे**




**दि.२२, खंडाळा (सातारा) :** शिरवळ येथील ज्ञानसंवर्धिनी प्रशालेने स्टेम (STEM) प्रयोगशाळेची केलेली उभारणी म्हणजे शाळेची भविष्यातील आव्हाने विचारात घेऊन केलेली कौतुकास्पद वाटचाल असल्याचे प्रतिपादन सातारा जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाचे उपशिक्षणाधिकारी हेमंतकुमार खाडे यांनी केले. प्रशालेने उभारलेल्या या प्रयोगशाळेची पाहणी त्यांनी केली व उपस्थित विद्यार्थ्यांना विविध प्रश्न विचारून त्यांच्या कौशल्यांची चाचपणी केली. यावेळी ते म्हणाले की, या स्टेम प्रयोगशाळेमुळे विद्यार्थ्यांना विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी व गणित यासंबंधीच्या संकल्पना प्रात्यक्षिकांद्वारे पडताळणी करण्याची संधी मिळते. तसेच, आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातील ड्रोन टेक्नॉलॉजी, रोबोटिक्स, थ्रीडी प्रिंटिंग यांसारख्या विषयांची ओळख विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासूनच करून देण्याचे महत्त्वाचे कार्य या स्टेम प्रयोगशाळांमुळे घडत आहे.

खंडाळा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी गजानन आडे यांनी प्रशाला राबवत असलेल्या विविध उपक्रमांची यावेळी प्रशंसा केली. कांचन ननावरे यांनी देखील प्रशालेतील शालेय वातावरणाचे कौतुक करून प्रशालेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी या स्टेम (STEM) प्रयोगशाळेच्या पाहणीसाठी अमोल पवार (एफ. डी.ए.,जि.प. सातारा), प्रा.टी.आर.तुवर (वाय.सी.ज्यु. कॉलेज, सातारा), के.एम. जाधव ( उपशिक्षक, अण्णासाहेब कल्याणी विद्यालय, सातारा) हे उपस्थित होते.

## ठाणेकरांना लवकरच मिळणार वाजवी दरात अस्सल कोकणचा दर्जेदार हापूस

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२३, ठाणे :** चोखंदळ आणि खवय्या ठाणेकरांचे लक्ष लागून राहिलेला १८ वा आंबा महोत्सव येत्या १ मे पासून सुरू होत आहे. आमदार संजय केळकर यांची संस्कार सेवाभावी संस्था आणि कोकण विकास प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या आंबा महोत्सवाला महाराष्ट्र शासनाच्या कृषी पणन मंडळाने पुरस्कृत केले आहे. १ ते १२ मे या कालावधीत ठाण्याच्या गावदेवी मैदानात शेतकरी ते ग्राहक अशी थेट विक्री व्यवस्था असणाऱ्या या आंबा महोत्सवात, कोकणातील अस्सल हापूस, पायरी, रत्ना, केसर आंब्याबरोबरच, आंबा-फणस पोळी, सरबते, काजू, मालवणी मसाले, पापड अशा विविध दर्जेदार कोकणी उत्पादनांचे ४५ स्टॉल्स असणार आहेत. हा केवळ बाजार नसून शेतकरी आणि ग्राहकांना दिलासा देणारी एक चळवळ आहे. या महोत्सवात धान्याचे ५ स्टॉल असणार असून महिला बचत गटांदेखील




५ स्टॉल असणार आहेत.

शेतकऱ्यांना हात देताना सर्वसामान्य ठाणेकरांनाही दर्जेदार हापूस आंबा विकत घेऊन त्याचा आस्वाद घेता यावा, यासाठी ही चळवळ गेली १८वर्षे सुरू असल्याची माहिती संस्कार संस्थेचे अध्यक्ष व महोत्सवाचे आयोजक आमदार संजय केळकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी कोकण पदवीधर मतदार संघातील आमदार निरंजन डावखरे, भाजपा ठाणे शहर जिल्हा अध्यक्ष संजय वाघुले, माजी उपमहापौर अशोक भोईर, सुभाष काळे, कोकण विकास प्रतिष्ठानचे राजेंद्र तावडे, परिवहन सदस्य विकास पाटील, ठाणे जिल्हा हाउसिंग फेडरेशनचे अध्यक्ष सीताराम राणे, संतोष साळुंखे, विष्णू रानडे उपस्थित होते.

कोकणातील एकुण १,८०,००० हेक्टर जमिनीवर आंब्याची लागवड केली जाते. २०२२ साली कोकणातील आंब्याचे उत्पादन ३,२०,००० मेट्रीक टन होते. यातील २६० कोटी रुपयांची आंब्याची विक्री मुंबई व भारतभर केली गेली आणि १०० कोटी रुपयांचा आंबा निर्यात केला गेला. दरवर्षी हे उत्पादन घटत जाऊन २०२३ मध्ये २,५६,००० मेट्रीक टन आणि २०२४ मध्ये १,२८,००० मेट्रीक टन झाले असून १२६ कोटी रुपयांची आंबा विक्री देशभर केली गेली आणि ५४ कोटी रुपयांचा आंबा निर्यात केला गेला.

दरम्यान यावर्षी कोकणात अवेळी पडलेला पाऊस आणि ढगाळ वातावरणामुळे फळगळ झाली व थ्रीप्स रोग, तुडतुडा किटकांच्या प्रादुर्भावामुळे तीस टक्केच आंबा पीक हाती लागले आहे.त्यामुळे मागील दहा वर्षांपासून सातत्याने कोकणातील शेतकरी आर्थिक संकटात आहे. या साऱ्या परिस्थितीचा जाणकार ठाणेकर सहानुभूतीने विचार करेल व वाजवी दरातील दर्जेदार आंबा जास्तीत जास्त खरेदी करून कोकणातील शेतकऱ्यांना पाठबळ देईल, असा विश्वास आमदार संजय केळकर यांनी व्यक्त केला आहे.

## चैत्रातच पेटला वैशाख वनवा ! उन्हाच्या तिव्रतेवर जनजागरण आवश्यक

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२२, मुदखेड (नांदेड) :** पूर्वी वैशाख महिन्यातच सूर्याची आग ओक चालू होत असल्याने वैशाख महिना हा उन्हासाठी खडतर मानला जायचा. मात्र हल्ली निसर्गाचं संतुलन बिघडल्यानं म्हणायचं कि काय अगदी चैत्रातच वैशाख वनवा पेटलेला पाहायला मिळतो. विशेष ग्रामीण भागात शेतकरी आपल्या गुरा ढोरांसह दैनंदिन कामकाजाला शेतावर जात असल्यानं खेड्यात उन्हाचे परिणाम जास्तीचे दिसून येतात एवढं नक्की. त्यामुळं उन्हा पासून सावध राहण्यासाठी प्रशासनाकडून ग्रामीण भागात जनजागृती होणं गरजेचं आहे.

पर्यावरण संतुलनासाठी सरकारकडून मागील दोन तीन दशकांपासून झाडे लावा झाडे जगवा या सारख्या महागड्या योजनांची अंमलबजावणी झाली खरी परंतू




या वर्षी लावलेले रोपटं पुढच्या वर्षी जगत नाही म्हणून दरवर्षी रोपटे लावण्याच्या योजना चालूच असतात. या बाबतीत एकंदर आंधळं दळते आणि कुत्रं पीठ खाते असच झालं आहे. वृक्ष लागवड यशस्वी झाली नाही तर नाही. परंतू जंगलतोड अजून थांबलेली नाही. वन विभागांकडून दरवर्षी मोठ्या प्रमाणात रोपटे लावली जातात परंतू त्याची देखरेख करणारेच अदृश्य राहत असल्यामुळे सरकारचं नेहमीच पालथ्या घागरिवर पाणी असते. जंगलाचे अस्तित्व कमी झाल्याने पावसाळ्यात ओकटे ऊन पडते. उन्हाळ्यात थंडी वाजते तर हिवाळ्यात पाऊस पडतो. प्रमाणापेक्षा त्यात कमी जास्त काही झालं की अतिवृष्टी होते. गारा वादळा सारखी परिस्थिती निर्माण होते. जंगल वाढल्याने अनियमित चालणारे ऋतू संतुलित राहण्यास मदत होते. असे अनेक फायदे आहेत. १०० टक्के मतदान करा, निरक्षर असलेले साक्षर व्हा, आपली मुलं शाळेत पाठवा, झाडे लावा झाडे जगवा जसे यांवर प्रशासनाकडून जनजागृती केली जाते मग एवढया उन्हापासून बचाव करा म्हणून ग्रामीण भागात जनजागृती का नको असे ऐकायला मिळते.

## बेलापूर व नेरुळ विभागात अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२३, नवी मुंबई :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) भागवत डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने नेरुळ व बेलापुर विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील नेरुळ विभागाअंतर्गत दिनेश मिश्रा, विनायक डेरी, विघ्नहर सोसायटी, प्लॉट नं.१, शॉप नं.६ सेक्टर-१०, नेरुळ, नवी मुंबई, यांचे सदर ठिकाणी प्रत्यक्ष पहाणी केली असता अंदाजे २.४५ मी द ७.८०



मी मोजमापाचे पोटमाळ्याचे वाढीव बांधकाम करून वापर सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर अनधिकृत बांधकामधारकाला अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी नेरुळ विभाग कार्यालयाकडून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ (१अ) अन्वये दि.११ मार्च २०२५ रोजी नोटीस बजावण्यात आलेली होती. तथापि नोटीसीची मुदत संपुष्टात येऊनही अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविण्यात आले नाही.

त्यामुळे सदर अनधिकृत बांधकामावर नेरुळ विभाग कार्यालयामार्फत दि.२२ एप्रिल २०२५ रोजी अनधिकृत बांधकाम निष्कासन मोहिमेचे आयोजन करुन अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले असून, संबधिताकडून १० हजार रुपये दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली. सदर कारवाई सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी जयंत जावडेकर, कनिष्ठ अभियंता संजय सोनटक्के व अतिक्रमण विभागातील कर्मचारी, मजुर, व गॅसकटरच्या सहाय्याने अतिक्रमण विभागाकडील पोलीस पथक समवेत सुरक्षारक्षक यांच्या मार्फत करण्यात आली आहे.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील, सेक्टर-२०, बेलापूर नवी मुंबई, दफनभुमीच्या मागे अनधिकृत झोपडया झाल्या होत्या. अे विभाग कार्यालय बेलापूर मार्फत तोडक कारवाईचे आयोजन करुन, सेक्टर-२०, बेलापूर नवी मुंबई, दफनभुमीच्या मागे असलेल्या ७२ अनधिकृत झोपडया निष्कासित करण्यात आलेल्या आहेत. या धडक मोहिमेसाठी अे विभाग कार्यालय अंतर्गत बेलापूर विभागातील अधिकारी/ कर्मचारी, जेसीबी, मजूर, वाहन आयचर, तसेच अतिक्रमण विभागाकडील पोलीस तैनात होते.

## महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणुका कायदेशीर तरतुदीनुसारच : भारत निवडणूक आयोग

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२३, ठाणे :** महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकानंतर मतदार यादी व मतदानप्रक्रियेवर करण्यात येत असलेल्या आरोपांना भारत निवडणूक आयोगाने उत्तर दिले आहे. आयोगाच्या स्पष्टीकरणानुसार, निवडणूक प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची त्रुटी नसून, सर्व कायदेशीर तरतुदींनुसारच निवडणुका पार पडल्या आहेत.

आयोगाच्या माहितीनुसार, महाराष्ट्रात ६ कोटी ४० लाख ८७ हजार ५८८ मतदारांनी मतदान प्रक्रियेत सहभाग घेतला. सकाळी ७ ते संध्याकाळी ६ या वेळेत दर तासाला सरासरी ५८ लाख मतदारांनी मतदान केले. तथापि, शेवटच्या दोन तासांत अपेक्षित ११६ लाखांच्या तुलनेत केवळ ६५ लाख मतदारांनी मतदान केले, हे लक्षवेधी असले तरी त्यावरून कोणत्याही गैरप्रकाराचा निष्कर्ष काढता येत नाही, असे आयोगाने स्पष्ट केले.

प्रत्येक मतदान केंद्रावर उमेदवार व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत मतदान प्रक्रिया पार पडली. काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांकडून मतदानानंतर कोणतीही तक्रार अधिकृतपणे निवडणूक निर्णय अधिकारी किंवा निरीक्षकांकडे नोंदवण्यात आलेली नाही.

मतदार यादी संदर्भात आयोगाने सांगितले की, १९५० च्या लोकप्रतिनिधी अधिनियम व १९६० च्या मतदार नोंदणी नियमांनुसार तयार केली जाते. विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम दरवर्षी राबवला जातो आणि अंतिम यादी सर्व पक्षांना उपलब्ध यादी करून दिली जाते.

याशिवाय, अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यानंतर केवळ ९० अपीले करण्यात आली, जी एकूण मतदार संख्येच्या तुलनेत अत्यल्प आहेत. विशेष म्हणजे




काँग्रेसकडूनही कोणतीही मोठी तक्रार नोंदवलेली नाही.

मतदान प्रक्रियेत १ लाखांहून अधिक मतदान केंद्रांवर ९७,३२५ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) व सर्व पक्षांकडून १,०३,७२७ मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए) नेमले गेले होते. यामध्ये काँग्रेसच्या २७,०९९ बीएलए चा समावेश होता. त्यामुळे मतदार यादी संदर्भातील आरोप पूर्णपणे निराधार असून कायद्याचा अवमान करणारे असल्याचे आयोगाने स्पष्ट केले.

२४ डिसेंबर २०२४ रोजी निवडणूक आयोगाने काँग्रेसला लेखी उत्तर दिले असून, ही माहिती आयोगाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे. तरीही पुन्हा पुन्हा असे आरोप करून जनतेमध्ये संभ्रम निर्माण करणे अयोग्य असल्याचे आयोगाने म्हटले आहे.

